| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**<br>**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेसनोट २५१ - २३** **दिनांक : - ०७/०८/२०२३**

**!! सायबर जनजागृती कार्यक्रम !!**
**सायबर गुन्हे कक्ष, मिभाववि पोलीस आयुक्तालयाचा अभिनव उपक्रम.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील येथे शिक्षण घेत असलेल्या शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थांमध्ये सायबर गुन्हयांचे अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आदेशित केलेले होते.

मा. पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतून आज दिनांक ०६/०८/२०२३ रोजी सायबर जनजागृती कार्यक्रम **Cyber Awareness Programm** आयोजन **St.Thomas Orthodox Syrian Parish-Vasai Road Chulna- Bhabola Road, Suyog Nagar, Vasai Road (W), Dist.Palghar-401202** करण्यात आले होते. सदर वेळी पोलीस उप निरीक्षक श्री. प्रसाद शेनोळकर (सायबर गुन्हे कक्ष) यांनी नागरिकांना खालील विषयांवर सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले.

१) सध्यस्थितीत घडणारे वेगवेगळे सायबर गुन्हे (Trending Cyber Crimes.)
२) सोशल मिडीयासंदर्भात घडणारे गुन्हे (Social Media Related Crimes.)
३) ऑनलाईन सायबर गुन्हयांस कश्याप्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती (Precautions to be Taken.)
४) ऑनलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व व कश्याप्रकारे तक्रार नोंदविता येईल याबाबतची माहिती. (Where and How to Complaint ?)

यावेळी १० ते ६५ वयोगटातील एकुण ६५० व अधिक तरुण मुल, महिला व जेष्ठ नागरिक हजर होते.
***तरी सायबर गुन्हे कक्ष,मि.भा.व.वि. यांचेकडून नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की,***

**१. अनोळखी नंबरवरुन आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करू नये.**
**२. आपली गोपनीय माहिती वेबसाईटवर भरण्यापुर्वी नमुद वेबसाईटचा युआरएल काळजीपुर्वक तपासा.**
**३. बँकेच्या कार्ड तपशील, पिन, ओटीपी पासवर्ड इत्यादी वैयक्तीक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करू नका.**
**४. लिंकवर क्लिक करण्यापुर्वी आधी विचार करा.**
**५. टेलीग्राम मध्ये येणाऱ्या फसव्या लिंक्सवर क्लिक करू नये.**
**६. नामांकीत कंपन्यांमध्ये वर्क फ्रॉम होम करुन पैसे कमावण्याचे आमिषाला बळी पडू नका. (अमॅझोन, फ्लिपकार्ट,नोकरी.कॉम इ.)**

तरी मिरा-भाईंदर,वसई-विरार शहरातील नागरीकांना सायबर गुन्हे कक्ष,मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत की, अशा प्रकारे होणाऱ्या फसवणूकीबाबत सतर्क

रहावे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.